000354



## लेखक परिचय:-


प्रा. डॉ. रोनिल कुलभुषण आहाळे

एम.कॉम., जि.डी.सी. अ‍ॅण्ड ए.नेट, पीएच.डी.

महाविद्यालयाचे नाव - डॉ.एच.एन.सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय, पातुर जि. अकोला


अनुभव - एकुण 10 वर्ष

संशोधन पेपर - आतंरराष्ट्रीय - 5
- राष्ट्रीय -32
- राज्य - 15

पद - 1. पीएच.डी. सुपर वाइजर एकुण 4 विद्यार्थी संशोधन करीत आहेत.
2. समाजकार्यात आवड असल्यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन पथकाचा कार्यक्रम अधिकारी म्हणून सलग 9 वर्ष काम, 2 वर्ष पातुर तालुका क्षेत्रिय समन्वयक.
3. दिगंबर जैन धाकड उन्नती मंडळाचे अध्यक्ष पद.

अवॉर्ड - 1. सन 2010 ला विद्याभुषण पुरस्काराने सन्मानित.
2. सन 2013 ग्रामगिता परिक्षा उत्कृष्ट आयोजन, अकोला जिल्हा पुरस्काराने सन्मानित.
3. सन 2014 संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, रा.से.यो. विभाग, स्वच्छता अभियान, (महाविद्यालयास) अकोला जिल्हा प्रथम पुरस्काराने सन्मानित.
4. सन 2016 अव्हान शिबिर टिम लिडर, सावत्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे तर्फे
5. सन 2018 शासकिय वैद्याकिय महाविद्यालय तर्फे (रक्तदान 35 पेक्षा जास्त) गुणगौरव पुरस्काराने सन्मानित.


ISBN-978-93-88708-94-4

978-93-88708-94-4

Rs.225/-

Published by : SAI JYOTI PUBLICATION
Behind Chawla Sadi center, Tin-nal, Chowk, Kasarpura, Itwari, Nagpur-44002
Phone - 9764673503, 9923593503
Email : Sjp10ng@gmail.com Website : www.saijyoti.in

Available Also on Flipkart SHOPCLUES amazon





# इंटरनेट आणि वर्ल्ड वाईड वेब - २

# Internet And World Wide Web - II

### बी. कॉम- सत्र सहावे

**प्रा. डॉ. रोनिल कुलभुषण आहाळे**



000355

- इंटरनेट आणि वल्ड वाईड वेब-२
  (Internat and World Wide Web-II)
- © लेखक
- प्रथम आवृत्ती - २०२०

No Part of this book shall be reproduced, stored in retrieval system, no translated in any form or by any means, electronic, mechanical, photocopying and / or otherwise without the prior written permission of the publishers.

ISBN : 978-93-88708-94-4

प्रकाशक व मुद्रण :
**श्री नरेश खापेकर,**
साई ज्योती पब्लिकेशन
तिन-नल चौक, कासारपूरा
इतवारी, नागपूर - ४४०००२
मो. नं. ९७६४६७३५०३
ई-मेल - spj10ng@gmail.com
वेबसाईट - www.sajyoti.in

सेल ऑफिस :
**ओम साई पब्लिशर्स आणि डिस्ट्रीब्यूटर्स**
२९, इंदिरा नगर, टी.बी. वॉर्डच्या मागे,
नागपूर-४४०००३
मो. नं. ९९२३६९३५०६
ई-मेल - ospdnagpur@yahoo.com

**बुक्स एन बुक्स**
६५, राधीका पॅलेस,
मेडीकल चौक, हनुमान नगर,
नागपूर-४४०००९
फोन नं. ९९२३५९३५०३

अक्षर जुळवणी :
दिनेश बोरीकर, डाटा-लाईन कॉम्प्युटर्स
५८३, हंसापुरी, छोटी खदान, नागपूर-१८

### Sant Gadge Baba Amravati University

## Syllabus

### B.Com. Semester - VI

### Internet and World Wide Web - II

**Unit - I :**

1.1 : Web Browsing : History of Web Browsers, Basic Functions of Web Browser, Types of Web Browsers.

1.2 : Features of : Internet Explorer, Google Chrome, Mozilla Firefox, U C Browser and Opera Mini.

**Unit - II :**

2.1 : Web Directory : Meaning of Web Directory, Features of Web Directory, Types of Web Directory.

2.2 : Search Engines : Meaning of Search Engines, History of Search Engines, Guideline for Effective Searching.

2.3 : Features of Google, Bing and Yahoo Search Engines.

**Unit - III :**

3.1 : Social Networking Websites : Meaning of Social Networking Website, Features of Social Networking Websites, Objectives of Social Networking Website, Features of Facebook, Instagram and Tweeter Website.

3.2 : Mobile Applications (App) : Meaning of Mobile App, Features of Mobile App, Feature of What's App, Google Play Store and BHIM App.

**Unit - IV:**

4.1 : Google Drive : Meaning of Google Drive, Features and Uses of Google Drive.

4.2 : Google Forms : Meaning of Google Forms, Features of Google Forms, Creating of Google Forms, Sending Google Forms for Survey.

4.3 : Google Classroom : Concept of Google Classroom, Features of Google Classroom, Creation of Google Classroom.

**Unit - V :**

5.1 : M.S. Front Page Express : Concept & Features of MS Front Page and its Important, Opening Window of Front Page.

5.2 : Using MS Front Page to Create Webpage : *Entering & Editing Text,* Inserting Images, Symbol, Labels and Forms.

ICHR Sponsored One Day National Seminar on the Occasion of

Azadi ka Amrit Mahotsav

# Contribution of Women in Indian Independence Movement

Organized by


Department of History

Late Dattatraya Pusadkar Arts College,

Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.


Editor


Dr. Govind Tirmanwar



OM SAI PUBLISHER & DISTRIBUTORS

# स्वातंत्र्य आंदोलनात अकोला जिल्ह्यातील स्त्रियांची भूमिका

डॉ. व्ही. जी. वसू
इतिहास विभाग प्रमुख
डॉ. एच .एन. सिन्हा कला व वाणिज्य
महाविद्यालय, पातुर.

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात इसवी सन १९२० हे वर्ष क्रांतिकारी ठरले. यावर्षी राष्ट्रीय सभेने गांधींनी पुरस्कृत केलेला असहकाराचा ग़स्ताव मान्य केला. त्याचाच परिणाम म्हणजे तरुण विद्यार्थी शेतकरी कामगार असे भिन्न वर्ग चळवळीत सक्रिय रित्या भाग घेऊ लागले. भारतीय महिलाही मागे राहिल्या नाहीत. काही महिला तर राष्ट्रीय पातळीवर जनसामान्यांचे नेतृत्व करू लागल्या. राजकीय जाणिवेचा व राष्ट्रीय भावनेचा प्रादुर्भाव झालेल्या विदर्भातील महिला १९२० पासून झपाट्याने बदलणाऱ्या देशातील वातावरणामुळे प्रभावित होणे आणि राष्ट्रीय कार्यासाठी प्रेरित होने स्वाभाविक होते. १९२० च्या डिसेंबर महिन्यात नागपूरला झालेल्या राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनात हो सावकाराचा कार्यक्रम प्रचंड बहुमताने मंजूर झाला. तसेच राष्ट्रीय सभेचे कार्य पोहोचविण्याची नवी कार्यपद्धती ही अंगीकृत करण्याचा निर्णय येथे घेण्यात आला. त्यामुळे राष्ट्रीय सभेच्या कार्याला नवे मार्ग व दिशा मिळाली याचा प्रभाव विदर्भावर आणि विशेषता अकोला जिल्ह्यावर लवकरच दिसून आला.

## असहकार आंदोलन

अकोला जिल्ह्यातील शेगाव येथे २६ ऑक्टोबर १९२१ रोजी भगवती देवी चे व्याख्यान झाले. असहकाराचा कार्यक्रम पोस्ट केला गेला आणि स्वराज्य फंडा साठी पैसे गोळा करण्यात आले. १९२१ च्या नोव्हेंबर मध्ये मद्यपान बंदीच्या कार्यक्रमासाठी अमरावतीच्या काही महिला अकोल्याला गेल्या त्यात चंद्रभागाबाई वडोदकर याही सामील झाल्या. अकोल्याच्या जिल्हा कचोरी जवळ सकाळी अकरा वाजता मद्याच्या लिलावाला सुरुवात झाली. राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेल्या स्वयंसेवकांनी हा लिलाव अडविला तेव्हा त्यांना अटक झाली व तीन दिवस अकोल्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. ही वार्ता उदय या वृत्तपत्रातून आठ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रकाशित झाली. १ डिसेंबर ४ डिसेंबर अकोल्याला अखिल भारतीय महाराष्ट्र अधिवेशन भरले. भगवती देवी व जबलपूरच्या सुभद्राकुमारी चव्हाण या अधिवेशनाला उपस्थित होत्या.

अकोला येथील महिला राष्ट्रीय कार्यात सक्रिय होत्या. इसवी सन १९२५ मध्ये अकोला येथे मुंबईच्या लक्ष्मी बाई फडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत महिलांनी सूत कातायला शिकावे, विदेशी कापडावर बहिष्कार घालावा, आपापल्या घरच्या पुरुषांना राष्ट्रीय कार्याला उद्युक्त करावे अशा आशयाची भाषणे झाली. त्याच वर्षी अकोल्याला फडके यांच्या घरी चरखा मंदिराची स्थापना झाली. दर सोमवारी बायका गोळा होई आणि चरखा वापरण्याचे शिक्षण त्यांना दिले जाई. डिसेंबर १९२६ मध्ये अकोल्याला गौरी मेहता यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत व व्हराड महिला संमेलन भरले. संमेलनाला महिला मोठ्य संख्येने उपस्थित होत्या बाहेरगावाहून सुमारे ७५ महिला आल्या होत्या. या अधिवेशनाला महिलांच्या प्रगतीच्या दृष्टीने बरेच ठराव पारित करण्यात आले. त्यात कायदे मंडळात महिलांना प्रतिनिधित्व, शैक्षणिक प्रगती, बालसंगोपन, चरख्याचा व स्वदेशी चा प्रचार यावर ठराव करण्यात आले.

## सविनय कायदेभंग आंदोलन

विदर्भातील सविनय कायदेभंग लढ्याची सुरुवात अकोला जिल्हा पासून झाली. काही काळ संपूर्ण लढ्याच्या संचालनाचे केंद्रस्थान अकोला होते. दांडी येथे मिठाचा कायदा मोडतात मोहिमेला सुरुवात झाली व नित्याचे कार्य करणाऱ्या या जिल्ह्यातील काँग्रेस समित्या बरखास्त करण्यात आल्यात आणि युद्ध मंडळे स्थापन करण्यात आली. १६ मार्च १९३० ला प्रांतिक काँग्रेस कमिटीने आपले अधिकार पश्चिम विदर्भ प्रांतिक युद्ध मंडळाच्या स्वाधीन केले. पश्चिम विदर्भाच्या युद्ध मंडळाचे सर्वाधिकारी अमरावतीचे वीर वामनराव जोशी होते तर ब्रिजलाल बियाणी कडे युद्ध मंत्रिपद देण्यात आले होते. डॉक्टर पटवर्धन अकोल्याचे का.वी.सहस्त्रबुद्धे, खामगाव चे झुन झुन वाला यांच्याबरोबर दुर्गाताई जोशी आणि ताराबेन मश्रुवाला ह्या अकोल्याच्या दोन महिलांचा प्रांतिक विधिमंडळात समावेश करण्यात आला होता. त्यांच्या खेरीज अन्य तीन सदस्य होते शिवाय कार्यकारी मंडळ, प्रसिद्धी खाते व प्रचार समितीही आयोजित केली होती. प्रचार समितीत प्रचार समितीत वामनराव जोशी, दुर्गाताई जोशी, तारा बेन मश्रुवाला आणि सहस्त्रबुद्धे यांचा समावेश होता.

दहीहांडा ह्या अकोट तालुक्यातील गावाजवळील खाऱ्या पाण्याच्या विहिरीतून पाणी काढून मीठ तयार करण्याचे व मिठाचा कायदा मोडण्याचे ठरले. पुढे तालुक्याच्या ठिकाणी दहीहांडा चे पाणी पाठवून मिठाचे सत्याग्रह झाले. पूर्व विदर्भात खारे पाणी उपलब्ध नसल्यामुळे नागपूर जिल्ह्याचे पथक दहीहांडा येथे येऊन पोहोचले. या पथकाचे नेतृत्व सहस्त्रबुद्धे यांच्याकडे होते. नागपूरच्या पक्षाला विदर्भाच्या मिठाच्या सत्याग्रहात अग्रक्रम देण्यात आला होता. दिनांक १२ एप्रिलला दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक आणि इतर काही व्यक्ती अकोल्याहून दहीहंड्य ला येउन पोहोचल्या. दहीहांडा येथे दुर्गाताइ जोशी डॉक्टर पटवर्धन आणि अन्य लोकांची भाषणे झाली विदर्भातील खेड्यपाड्यतून या कार्यक्रमाला लोकांची गर्दी वाढल्यामुळे संपूर्ण प्रांताचे लक्ष या कार्यक्रमाकडे लागले होते. विहिरीचे पाणी काढून मीठ तयार करून ते विकून कायदेभंग करण्यात आला. अकोल्याला पू.ब.गोळे यांच्या अध्यक्षतेखाली दुर्गाताई जोशींचे व्याख्यान झाले आणि मिठाचा कायदे भंग केल्याचे घोषित केले. सरकार मात्र या वेळी मूग गिळून बसले होते. प्रांतिक युद्ध मंडळाच्या स्थापनेपासून या मंडळाच्या केवळ सदस्यच नव्हे तर प्रचार माध्यमाद्वारे कार्य करणाऱ्या दुर्गाताई इसवी सन १९२० पासूनच खेडोपाडी जाऊन प्रचार कार्य करीत होत्या परंतु तेवढ्यने त्यांचे समाधान झाले नाही परिणामी स्त्रियांचे पथक घेऊन आपणही कायदे भंग करावा असे त्यांनी ठरविले. पुरुष पथकाप्रमाणेच महिलांचे पथक तयार करून २१ एप्रिल ला अकोल्याचे टिळक मैदानावर दुर्गाताई यांच्या नेतृत्वाखाली ''नमक का कानून तोड दिया'' या गर्जनांनी आसमंत दणाणून मिठाचा कायदा तोडून त्या ठिकाणी मिठाची विक्री करण्यात आली. या सभेत दुर्गाताई जोशी, लीलाताई ओक, ब्रिजलाल बियाणी यांची भाषणे झाली. या कार्यक्रमात यशोदाबाई आगरकर, विजयालक्ष्मी मश्रुवाला व काशीबाई लिमये सहभागी झाल्या होत्या. अकोला येथील कायदेभंगाची बातमी कळताच सर्व प्रांतातील महिलावर्ग जागृत होऊन यवतमाळ, अमरावती इत्यादी जिल्ह्यातील महिलांनी कायदेभंगाचे आंदोलन राबविले.

सरकारने राष्ट्रीय भावनेला खतपाणी घालणारी काही पुस्तके जप्त केली होती तेव्हा जप्त केलेल्या पुस्तकातील उतारे वाचून कायदेभंग केल्या जात असे. इंग्रजी पुस्तक "India in Bondage" चिपळूणकरांचे "आमच्या देशातील सद्य स्थिती" आणि हिंदी भाषेतील "काकोरी के शहीद" या जप्त केलेल्या पुस्तकातील ठराविक उतारे व ''भारत जननी तेरी जय हो विजय हो'' हे पद निवडण्यात आले होते. दिनांक १० मे ला अकोला येथील ४००० लोकांच्या सभेत ब्रिजलाल बियाणी, दुर्गाताई जोशी आणि महात्मा गांधींच्या सुनबाई सुशीला गांधी यांनी जप्त वाडमयाचे वाचन केले. विदेशी कापडावरील बहिष्कार आणि दारू दुकानावरील निरोधने हा सुद्धा सविनय कायदेभंगाचा उपक्रम होता. त्याप्रमाणे एक आठवडाभर ३० महिला आणि ५० पुरुष यांनी अकोल्याला दारू गुत्त्यावर निरोधने केली. ब्रिजलाल बियाणी आणि दुर्गाताई जोशी यांनी निरोध धनाच्या कार याकडे जातीने लक्ष दिले.

गुत्यावरील निरोधनाचे ची वेळ सामान्यता सायंकाळी पाच ते आठ ही असायची. यावेळी अनेक स्त्री–पुरुष जमत असल्यामुळे जमावासमोर ऊन दारू पिण्यास जाण्याची हिम्मत दारू पिणाऱ्या स होत नसे. निरोध धनाच्या कार्यात अकोल्यामध्ये सुशिलाबाई गांधी, राधाबाई ओक, ताराबेन मश्रुवला, गंगुबाई बापट, उमाताई मराठे या महिलांनी चांगली धडाडी दाखवली.

विदेशी कापडावरील निरोधनेही गुत्या वरील निरोधना प्रमाणेच सुरू करण्यात आले. परंतु बहुतेक ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी विदेशी कापड न मागविण्याचे व तसेच जवळ असलेले कापड मोहोळ बंद करून ठेवण्याचे कबुल केल्यामुळे हे कार्य फारसे करावे लागले नाहीत. जंगल सत्याग्रह हा क्रांती का युद्ध मंडळाच्या चळवळीचा एक विशेष भाग होता .

अकोला जिल्ह्यातील लोणी हे जंगल सत्याग्रहाचे केंद्र होते. ओक कुटुंबातील तीन महिला प्रमिलाताई ओक, राधाबाई ओक, लीलाताई ओक ह्या अत्यंत उत्साहाने कार्य करीत जंगल सत्याग्रह मध्ये अकोल्यातील दुर्गाताई जोशी, सुभद्रा बाई जोशी, सुशिलाबाई गांधी, उमाबाई मराठे, रमाबाई केळकर आणि चंपू ताई बनसोड यांनी भाग घेतला. अकोला जिल्ह्यातील या महिलांना तुरुंगातही डांबण्यात आले. गांधी इरविन करार मोडल्यामुळे सविनय कायदेभंगाची चळवळ शिथिल झाली. परंतु या करारामुळे जनतेचा अपेक्षाभंग झाला. त्यामुळे इसवी सन १९३२ मध्ये पुन्हा सविनय कायदेभंग चळवळ सुरुवात झाली. सरकारी यंत्रणा चळवळीच्या दुसऱ्या टप्प्याच्या वेळी कसेही करून चळवळ दाडपयची याच हेतूने दमन कार्य करू लागली. विदर्भात इतर प्रांता प्रमाणे वटहुकूम जारी केला नव्हता तरीही बेकायदा घोषित केलेल्या संस्थेच्या कार्यात भाग घेणे हा शिक्षापात्र गुन्हा होता. सरकार विरोधात व्यासपीठावर भाषण देणे म्हणजे अटकेला आमंत्रण देण्यासारखे होते. दिनांक २५ जानेवारी १९३२ या दिवशी २६ जानेवारीच्या स्वातंत्र्य दिनाची तयारी सुरू असताना सत्याग्रह चे युद्ध मंत्री ब्रिजलाल बियाणी, दादासाहेब गोरे आणि दुर्गाताई जोशी या वरिष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली. अकोला शहरातील आंदोलनाची धग जिल्ह्यातील ग्रामीण भागापर्यंत पोहोचली. या सत्याग्रहात खपली कुटुंबाने बलिदान दिले. जिल्ह्यात उमाबाई खपली, सुंदराबाई देशमुख, सुभगाबाई काशीकर यांना वेगवेगळ्या गुन्ह्यात अटक करण्यात आली. गंगुबाई बापट यांचे कार्य ही या सत्याग्रहात मौलिक स्वरूपाचे होते.

## चले जाव आंदोलन

देशात अभूतपूर्व राष्ट्रीय जागृती निर्माण झालेल्या इसवी सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये अकोला जिल्ह्यातील महिलांचे फार मोठे योगदान आहे. १३ जून १९४२ ला सुभद्राबाई जोशींचे अकोल्याला भाषण झाले गांधींच्या, ''करा किंवा मरा'' या घोषणेमुळे प्रत्येक कॉंग्रेस कार्यकर्ता लढ्यत उतरला होता. या राजकीय वातावरणात ब्रिटिश सरकारने कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना अटक केली. २० जुलै १९४२ ला प्रमिलाताई ओक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत महिलांनी जनतेच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा म्हणून प्रोत्साहन द्यावे अशा आशयाची भाषणे झाली. प्रमिलाताई ओक यांनी दोन ऑगस्टला दुसऱ्या सभेचे अध्यक्षपद स्वीकारले होते तेव्हा वर्धेला कॉंग्रेस कार्यकारिणीने घेतलेल्या 'निर्णयाबाबत विश्वास व्यक्त करण्यात आला. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणे, जनतेत चळवळी करता प्रचार करणे आणि हिंद सेवादलाचे सदस्य होणे याबाबत ठराव पारित करण्यात आले. सहा ऑगस्टला १५ लोकांची सभा सुभद्रा ताई जोशी यांच्या उपस्थितीत अकोल्याला पी. वाय. ओकांच्या लोकांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. जी. वी. कर्णिक, डॉक्टर जे. आर. कर्णिक, ए. के. देशपांडे, एम. जी. आगरकर उपस्थित होते. कॉंग्रेसने पारित केलेला वर्धा ठराव डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमाची आखणी केली. जो कार्यकर्ता पोलिसांना बघितल्याबरोबर रणांगण सोडून पळून जाईल अशा कार्यकर्त्यांची निवड न करता निवडक अहिंसा तत्वावर विश्वास असलेल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांची निवड करून त्यांच्याकडे शांतता कायम राखून (अ) १४४ कलम आणि कर्फ्यू कायदा मोडणे (ब) मिरवणूक काढणे (क)

सभांचे आयोजन करणे (ड) महाविद्यालया समोर धरणे देणे (ई) सरकारी नोकरांची आणि विशेषतः पोलिसांची सहानुभूती मिळवणे अशा प्रकारचे कार्यक्रम सभेत निश्चित करण्यात आले.

८ ऑगस्टला महात्मा गांधींना अटक केल्याची बातमी कळताच निषेध मिरवणूक काढण्यात आली. सरकारच्या कृतीचा निषेध व्यक्त करण्याकरता अकोला, कारंजा, अकोट, वाशिम, यावलखेड आणि अकोली जहांगीर येथे सभा घेण्यात आल्या. ९ ऑगस्ट ला ५००० लोकांची सभा झाली. या सभेत दुर्गाताई जोशी, डी. एम. केदार, एस. डी. ठानवी, बी. एन. उदासी, एम. बी. सोमानी, एम. ए. वैराळे ह्या काँग्रेस नेत्यांची अटकेचा निषेध करणारी भाषणे झाली. अनुसयाबाई संपतराव भोपळे, विठ्ठलराव माळी आणि इतर काही लोकांनी स्टेशन हाऊस वर जंगल कायदा मोडण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. राजस्थान भवन आणि अकोल्याची प्रेस ह्या काँग्रेस कार्यांच्या असलेल्या जागांना सरकारतर्फे मोहर लावण्यात आली. आठवड्यातून दोन दिवस निघणाऱ्या मातृभूमी या वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली. अकोल्याच्या कार्यकर्त्या मुंबईच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या अधिवेशनाला उपस्थित होत्या. दहा तारखेला सकाळी प्रमिलाताई मुंबईहून मेलने अकोल्याला आल्या तेव्हा शेकडो लोक पहाटेपासूनच रेल्वेस्टेशनवर जमा व्हायला लागले. त्याच दिवशी फडक्यांच्या मळ्यात प्रमिलाताई ओकांनी कार्यकर्त्यांची सभा घेतली. त्यांनी प्रथमतः महात्माजींच्या नावाचे बेकायदेशीर पत्रक अकोल्यात आणले. या पत्रकात संपूर्ण स्वातंत्र्य आणि करो या मरो या बाबींचा उल्लेख होता. ११ तारखेला पहाटेलाच पोलिसांची धाड दुर्गाताई जोशींच्या घरावर पडली त्यांना पकडण्या करता सत्तर अंशी पोलिसांनी चहूबाजूंनी आक्रमण केले. जय हिंद चौक, दगडी पुलांची वेस, शहरातल्या मशिदीच्या चौकात लाठिधरी पोलिस उभे ठेवले नंतर त्यांचा दरवाजा ठोठावण्यात आला त्यांना झोपेतून जागे करण्यात आले आणि अटक करण्यात आली.

अकोल्याच्या सावता मिल मजुरांनी सैनिका करिता कापड विणून देण्यास नकार दिला. त्यावेळी प्रमिलाताई ओक आणि जे .जी. शर्मा यांनी ४०० मिल मजुरांच्या सभेला सांगितले की, त्यांनी रेल्वे व पोस्ट ऑफिस वर आक्रमण करून तोडफोड व जाळपोळ करावी, सरकार कडून विरोध झाल्यास बळाचा वापर करावा व ब्रिटिशांना भारत सोडायला लावण्याकरता मरणाला तयार राहावे. या आंदोलनाचा परिणाम हळूहळू संपूर्ण शहरावर पडला. रेल्वे रूळ उखडले गेले, टेलीफोन तारा तुटल्या, शहरात १४४ कलम सुरू असताना २००० लोकांची मिरवणूक तारा तोडून टेलिफोनचे खांब उधळत निघाले रस्त्यात शाळा—महाविद्यालय, कापड गिरण्या, पेट्रोल पंप बंद करण्यात आले. या रणधुमाळीत सरोटा सिंगाने पोलिस अधिकाऱ्यावर कृपान काढल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. पोलिसांची नजर प्रमिलाताई वर होतीच त्या फडक्यांच्या मळयात भावाकडे राहायला गेल्या आणि पहाटे पुतण्याच्या सायकलवर घरी आल्या त्यामुळे पोलिसांना सापडू शकल्या नाही. प्रमिलाताई ओकानी १५००० नागरिकांच्या एका मिरवणुकीचे नेतृत्व केले. त्यावेळी त्यांच्या भाषणाने नागरिकांच्या हृदयात देशप्रेमाची भावना जागृत झाली. त्यांच्याबरोबर सुशिलाबाई खत्री, विमलाबाई देशपांडे, दयाबाई दहीकर, राधाबाई भाटिया, प्रेमा अनिस व सुभद्रा ताई गावंडे या महिला होत्या. प्रमिलाबाई बरोबरच्या महिला सुद्धा जोषाने "अंग्रेजो चले जाव", "भारत माता की जय" "महात्मा गांधी की जय" या सारखी नारे लावीत असत. यावेळी महिला आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाली. पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु या आंदोलनाची धग मात्र कायम राहिली. १९४२ चे आंदोलन हळूहळू शिथिल झाले असले तरीही जिल्ह्यात भूमिगत लढा सुरूच राहिला.

## निष्कर्ष

भारतीय स्वातंर्त्यलढ्यच्या इतिहासात विदर्भाचे फार मोठे योगदान आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रियांनी इ. स. १९२० ते इ. स. १९४७ या कालखंडातील असहकार, सविनय कायदेभंग व चले जाव आंदोलनात हिरीरीने सहभाग घेतला. विदर्भातील अकोला जिल्ह्यात दुर्गाताई

जोशी, प्रमिलाताई ओक, राधाबाई ओक, सुभद्राबाई जोशी, सुशिलाबाई गांधी, ताराबेन मश्रुवाला, रमाबाई केळकर, चंपू ताई बनसोडे याशिवाय अनेक महिलांनी इंग्रजांच्या दमन नीती विरोधात दंड थोपटले. स्त्रियांच्या आंदोलनातील सहभागामुळे सामाजिक मुक्तीला बोल मिळाले. एवढेच नव्हे तर भारताचे स्वातंत्र्य दृष्टिपथात आले. याबाबतचा परंपरागत दृष्टिकोण स्त्रियांच्या कर्तृत्वामुळे बदलला गेला. राष्ट्रीय लढ्यतील सहभागामुळे व्यक्तित्वाचा विकास घडवून आणण्याची संधी स्त्रियांना प्राप्त झाली.अकोला जिल्ह्यातील महिलांच्या जीवनाला नवी कलाटणी देण्याचे कार्य स्वातंत्र्यलढा मुळे घडले म्हणणे अधिक उचित ठरेल.

## संदर्भ ग्रंथसूची


१. पाठक दमयंती, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सह्कार्य श्री मंगेश प्रकाशन नागपूर २००३.
२. ओक के. य. स्मृतींच्या मशाली, स्वातंत्र्य लढ्यतील अकोला जिल्ह्याचे योगदान, मशाली प्रकाशन समिती अकोला १९८६.
३. उदासी बी. ना. अकोल्यातील राजकीय स्थित्यंतरे अकोला १९७०.
४. गोळे पू. ब. (सं), व्हराडची स्वातंत्र्य सेवा (१९२० ते १९३५) अकोला १९३५.
५. जोशी दुर्गाताई, 'विदर्भ कन्या' राजस्थान प्रिंटिंग अँड लिथो वर्कस लि. अकोला १९८६.